॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

Phone: (02462) 215294 **EXAMINATION DEPARTMENT** Website: srtmun.ac.in
email : directorboee@srtmun.ac.in

संदर्भ : समन्वय/२०२२-२३/९६३ दिनांक : २७/०८/२०२२

## महत्वाचे परिपत्रक

**प्रति,**
**मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये,**
**मा.संचालक, सर्व संकुले-विद्यापीठ परिसर,**
**मा.संचालक, उपकेंद्र-लातूर, परभणी,**
**मा.प्राचार्य, न्यु.मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली,**
**मा.समन्वयक, कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास आणि संशोधन केंद्र, किनवट,**
**प्रस्तुत विद्यापीठ.**

**विषय : उन्हाळी २०२२ मध्ये झालेल्या परीक्षेसंदर्भात गुणपडताळणी, उत्तरपुस्तिकेची छायाप्रत व पुनर्मूल्यांकनाचे आवेदनपत्र सादर करण्याबाबत विद्यार्थी व महाविद्यालयांना मार्गदर्शक सूचना.**
**संदर्भ : परीक्षा/२०२२-२३/९४२ दिनांक २३/०८/२०२२ चे पत्र.**

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, वरील संदर्भीय पत्रान्वये उन्हाळी-२०२२ परीक्षेतील बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. तृतीय वर्ष अभ्यासक्रमाचे निकाल जाहिर केलेले आहेत. सदर विद्यार्थ्यांकरीता गुणपडताळणी, उत्तरपुस्तिकेची छायाप्रत व पुनर्मूल्यांकनाचे आवेदनपत्र सादर करण्याच्या तारखा कळविण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत अभ्यासक्रमाच्या गुणपडताळणी, उत्तरपुस्तिकेची छायाप्रत व पुनर्मूल्यांकनाचे आवेदनपत्र सादर करण्याचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

१) अभ्यासक्रमांचे नांव : (i) BA(I & IIYr), BA(Interdisciplinary), BA(Animation), BSW, BA(Admin.), B.VOC (FT), BA (NMD College),

(ii) B.Com. (Gen) (I & II Yr), B.Com. (AT), B.Com. (ME), B.Com. (Banking), B.Com. (BI), M.Com. (Gen), B.Com. (NMD College), BBA (Gen), BBA (ABM), BBA (NMD College), M.Com. (NMD College), M.B.A. (All Campus), M.Com. (All Campus), PGDDM, Diploma in GST.

(iii) B.Sc. (Gen.) (I & II Yr), BCA, BCS, B.Sc.(C.S.), B.Sc. (B.T.) of New Model Degree College, Hingoli, M.Sc. All Subject (Campus and Sub-Campus), MSW(Campus and Sub-Campus) etc.

२) विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेच्या पेपरची गुणपडताळणी, सरळ पुनर्मूल्यांकन (Direct Revaluation), उत्तरपुस्तिकेची छायाप्रत व छायांकित प्रती नंतरचे पुनर्मूल्यांकन करता येईल.

अ) १) गुण पडताळणी (व्हेरीफीकेशन) रू. ७५/- प्रती पेपर.
२) उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत रू. ३५०/- प्रती पेपर.
३) छायांकित प्रती नंतरचे पुनर्मूल्यांकन रु. १५०/- प्रती पेपर.
४) थेट पुनर्मूल्यांकन रु. ३५०/- प्रती पेपर.
५) जास्तीत जास्त दोन उत्तरपुस्तिकेच्या छायांकित प्रती घेता येतील.

ब) विद्यार्थ्यांनी महाविद्यालय/विद्यापीठ संकुलामध्ये गुणपडताळणी, उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत सरळ पुनर्मूल्यांकनांचे आवेदनपत्र सादर करण्याचा **दिनांक ०७/०९/२०२२** असून, या तारखेनंतर कुठल्याही परिस्थितीत आवेदनपत्र स्वीकारले जाणार नाहीत.

क) महाविद्यालय/विद्यापीठ संकुलांनी विद्यार्थ्यांकडून प्राप्त शुल्काचा धनाकर्ष काढण्याचा **दिनांक : ०८/०९/२०२२**

ड) महाविद्यालय/विद्यापीठ संकुलांनी धनाकर्ष विद्याशाखानिहाय काढावा व आवेदनपत्र विद्यापीठात सादर करण्याचा **दिनांक :१०/०९/२०२२.**

ई) महाविद्यालय/विद्यापीठ संकुलांकडून प्राप्त झालेल्या उत्तरपुस्तिकेच्या छायांकित प्रती संबंधित विद्यार्थ्यांना त्वरित वितरीत करून सदर छायांकित प्रती प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांत इच्छुक विद्यार्थ्यांचे पुनर्मूल्यांकनाचे अर्ज विहीत शुल्कासह (रू. १५०/-प्रती विषय) स्वीकारून विद्यापीठात सादर करावेत.

फ) विद्यार्थ्यांना उत्तरपुस्तिकेची छायांकित प्रत घेऊन पुनर्मूल्याकंन किंवा थेट पुनर्मूल्यांमकन यापैकी एकच सुविधा घेता येईल. यासाठी महाविद्यालय/विद्यापीठ संकुलांनी अर्ज तपासूनच सादर करावेत.

०३. महाविद्यालय/विद्यापीठ संकुलांनी पुनर्मूल्यांकन शुल्काचा धनाकर्ष ''वित्त व लेखा अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड'' यांच्या नावे काढावा.

०४. वरील आवेदनपत्रे महाविद्यालय/विद्यापीठ संकुलांनी केवळ खास दुतामार्फतच परीक्षा विभागाकडे सादर करावीत. पोस्टाने किंवा अन्य मार्गाने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

०५. वरीलप्रमाणे मुदत संपल्यानंतर महाविद्यालय/विद्यापीठ संकुलानी कोणत्याही विद्यार्थ्याचे अर्ज परीक्षा विभागाकडे अग्रेषित करू नयेत, अशी आवेदनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

०६. महाविद्यालय/विद्यापीठ संकुलांनी सर्व विद्यार्थ्यांचे पुनर्मूल्यांकनाचे आवेदनपत्र एकत्रितपणे परीक्षा विभागाकडे सादर करावीत. कुठल्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना परीक्षा विभागात पाठवू नये.

**टीप -** १) पदवी अभ्यासक्रमांतील ज्या विद्यार्थ्यांचे निकाल Office Verification / "R" मुळे राखीव ठेवण्यात आलेले होते अशाही विद्यार्थ्यांचे पुनर्मूल्यांकनाचे अर्ज उपरोक्तप्रमाणे महाविद्यालय/संकुलांनी स्वीकारावेत व ती परीक्षा विभागाकडे पाठवावीत. दरम्यानच्या कालावधीत परीक्षा आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखा जाहीर झालेल्या असतील, तर विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनाचा निकाल लागण्याची वाट न पाहता परीक्षा आवेदनपत्रे भरावीत.

२) ज्या अभ्यासक्रमांचे निकाल दिनांक २७/०८/२०२२ नंतर जाहीर होतील, त्या अभ्यासक्रमांची उक्तप्रमाणे कार्यवाही ही निकाल प्राप्त झाल्यापासून १० (दहा) दिवसांच्या आत करावी.

सबब, वरीलप्रमाणे सर्व नियमांची /सूचनांची तंतोतंत कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव: सर्व अधिक्षक/सहा.अधिक्षक परीक्षा विभाग, सदर परिपत्रकाची काटेकोरपणे व तात्काळ अमलबजावणी करण्यात यावी.**